सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४

# महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४

(दिनांक ९ ऑगस्ट २००२ पर्यंत सुधारलेला)

**Maharashtra Act No. XXXIV of 1964**

# THE MAHARASHTRA FELLING OF TREES (REGULATION) ACT, 1964

*(As modified upto the 9th August, 2002)*

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[किंमत : रु. ५-००]

# महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४

## अनुक्रमणिका


उद्देशिका — पृष्ठे

कलमे,—

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व व्याप्ती | १ |
| २. | व्याख्या | १ |
| ३. | झाडे तोडण्यावरील निर्बंध | २ |
| ३ क. | झाडे लावण्याचा आदेश देण्याचा वृक्ष अधिकाऱ्याचा अधिकार | ३ |
| ४. | कलम ३ चे उल्लंघन करून झाडे तोडल्याबद्दल शास्ती | ४ |
| ५. | कलम ३ चे उल्लंघन करण्यात आल्याचे विवक्षित अधिकाऱ्यांनी कळविणे | ४ |
| ६. | या अधिनियमान्वये प्रकरणे निकालात काढण्याची कार्यपद्धती | ५ |
| ७. | शास्ती केल्यामुळे किंवा जप्तीमुळे इतर शिक्षांस बाध येणार नाही | ६ |
| ८. | चौकशी व कार्यवाही न्यायिक कार्यवाही असणे | ६ |
| ९. | अधिकारी हे लोकसेवक असणे | ६ |
| १०. | पैसे भरण्याविषयी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी | ६ |
| ११. | कार्यवाही चालविण्यास मनाई | ६ |
| १२. | सूट | ६ |
| १३. | व्यावृत्ती | ६ |
| १४. | त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यांच्या तरतुदींच्या बरोबरीनेच या अधिनियमाच्या तरतुदीही असतील. | ६ |
| १५. | नियम करण्याचा अधिकार | ७ |
| | अनुसूची | ७ |

(घ) '' महसूल अधिकारी '' याचा अर्थ, [१] [जमीन महसूल अधिनियमाच्या] अर्थानुसार असलेला महसूल अधिकारी, असा आहे;

(ङ) '' झाड तोडणे '' यामध्ये झाडास अतीव नुकसान पोहोचविण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळून टाकणे किंवा कापणे किंवा छाटणे या गोष्टींचा समावेश होतो;

(च) '' झाड '' याचा अर्थ, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले कोणतेही झाड; आणि राज्य शासनाला कोणत्याही प्रकारच्या झाडाचे संरक्षण करण्याच्या आवश्यकतेचा विचार केल्यानंतर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अनुसूचीत भर घालता येईल किंवा फेरबदल करता येईल ; आणि कलम १५ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदी या जेथवर विधानमंडळापुढे ठेवण्याशी आणि त्याच्याकडून फेरबदल केले जाण्याशी संबंधित असतील तेथवर त्या, त्या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या अशा अधिसूचनेच्या संबंधात लागू होतील ;

[२][ (च च) ''वृक्ष अधिकारी'' याचा अर्थ, वनक्षेत्रपालाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला 'वन अधिकारी,' असा आहे ;]

(छ) ''नागरी क्षेत्र'' याचा अर्थ, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपालिका समिती, नगर समिती किंवा त्या त्या वेळे पुरता अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये घटित केलेली अधिसूचित क्षेत्र समिती किंवा कटक यांच्या हद्दीतील क्षेत्र असा आहे; आणि त्यात पाच हजारपेक्षा कमी लोकसंख्या नसणाऱ्या आणि तीन-चतुर्थांशपेक्षा कमी पुरुष कामगार बिगरशेतकी धंद्यामध्ये गुंतलेले नसणाऱ्या, राज्य शासनाने राजपत्रामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा स्थानिक क्षेत्राचा समावेश होतो;

(ज) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ अनुक्रमे [३][जमीन महसूल अधिनियमात] त्यांचा जो अर्थ दिला असेल तोच असेल.

झाडे तोडण्यावरील निर्बंध.

३. (१) कोणतीही रुढी, परिपाठ किंवा त्या त्या वेळी अमलात असलेला कोणताही कायदा अथवा कोणत्याही न्यायालयांचा हुकूमनामा किंवा आदेश असला तरी किंवा कोणत्याही संलेखात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने रीतसर अधिकार दिलेल्या [४] [वृक्ष अधिकाऱ्याच्या] लेखी पूर्वपरवानगीशिवाय . . [५] * * * * * कोणतीही व्यक्ती स्वतःच्या मालकीच्या किंवा इतर कोणत्याही जमिनीतील कोणतेही झाड तोडणार नाही किंवा असे झाड तोडावयास लावणार नाही. [५] * * * * *

[६][ (१-क) कोणत्याही व्यक्तीची एखादे झाड तोडण्याची इच्छा असेल तर, ती त्यासंबंधात

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २ (ड) द्वारे ''संबंधित जमीन महसूल अधिनियमात'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम २ (अ) अन्वये, ''व कलम १५ अन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधानुसार असेल त्याव्यतिरिक्त'' हा मजकूर व ''परंतु, जर एखादे झाड निर्जीव झाले असेल'' या शब्दांनी सुरु होणारा व ''नाकारली जाणार नाही'' या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम २ (ब) अन्वये (१-क) ते (१-ग) हे खंड समाविष्ट करण्यात आले.

परवानगी मिळण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या [१][वृक्ष अधिकाऱ्याकडे] लेखी अर्ज करील.

(१-ख) अर्ज मिळाल्यावर [१] [वृक्ष अधिकारी]--

(क) त्या अर्जाची सात दिवसांच्या आत पोच देईल ;

(ख) योग्य ती चौकशी केल्यानंतर, कलम १५ अन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअनुसार मागितलेली परवानगी, त्यास देता येईल किंवा नाकारता येईल :

परतु, जर एखादे झाड निर्जीव झाले असेल, रोगट झाले असेल किंवा वाऱ्याने पडले असेल, किंवा वनसंवर्धनाच्या दृष्टीने पूर्णतावस्थेला पोहोचले असेल, [२] [किंवा त्यामुळे वाहतुकीला अडथळा होत असेल, किंवा आग, वीज, पाऊस किंवा अन्य नैसर्गिक कारणांमुळे त्याची मोठ्या प्रमाणावर हानी झाली असेल किंवा ते नष्ट झाले असेल, ] किंवा कार्यक्षमरीत्या लागवड करण्यास त्यामुळे अडथळा होत असेल तर, अशी कोणतीही परवानगी नाकारणार नाही :

[३] [ परंतु आणखी असे की, अर्जदार, वृक्ष अधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे, तेवढीच संख्या असलेली, त्याच किंवा अन्य जातीची झाडे त्याच जागी किंवा त्या परिसरातील अन्य सुयोग्य जागी लावील, या शर्तीस अधीन राहून अशी परवानगी देता येईल.]

[४] [ (१-ख क ) पोट-कलम (१-ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, यासंबंधात कलम १५ अन्वये केलेल्या नियमांना अधीन राहून, वृक्ष अधिकारी, कृत्रिम रोपणात इष्टतम वाढ होण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने झाडांची छाटणी किंवा तोड करणे यासारखी वृक्षसंवर्धनविषयक कामे करण्याकरिता पोट-कलम (१-क) अन्वये करण्यात आलेला अर्ज नाकारणार नाही.]

(१-ग) अर्जाची पोच दिल्याच्या दिनांकापासून किंवा अर्जाची पोच दिलेली नसल्यास, अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून, [५] [ साठ दिवसांच्या ] आत, [१] [वृक्ष अधिकाऱ्याने ] त्याचा निर्णय अर्जदारास कळविण्यात कसूर केल्यास त्याबाबतीत मागितलेली परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.]

(२) [६] [ पोट-कलम (१-ख) ] अन्वये परवानगी देण्यास नकार देणाऱ्या [१] [ वृक्ष अधिकाऱ्याच्या ] आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्याकडे अपील करता येईल. विहित करण्यात येतील अशा कार्यपद्धतीविषयक नियमांस अधीन राहून जिल्हाधिकाऱ्यास, अशा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या अपिलावर त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

झाडे लावण्याचा आदेश देण्याचा वृक्ष अधिकाऱ्याचा अधिकार.

[७] [ **३ क. (१) कलम १५ अन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे** विहित केलेल्या मानकांनुसार (राज्य शासनाकडून व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे कोणत्याही स्थायी अवर्षणग्रस्त क्षेत्रातील जमिनीव्यतिरिक्त) कोणत्याही जमिनीवर झाडांची संख्या पुरेशी नाही असे वृक्ष अधिकाऱ्याचे मत असेल तर, वृक्ष अधिकारी, आदेशाद्वारे, जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास त्याचे म्हणणे

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या अनुक्रमे कलम ३ (ब), (क) (एक), (ड) (एक) आणि (ई) (एक) अन्वये, मूळ मजकुराऐवजी "वृक्ष अधिकारी" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ (क) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ (क) (तीन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ३ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ (ड) (दोन) अन्वये "नव्वद दिवसांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ (ई) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे त्या जमिनीच्या अशा जागांवर यथास्थिति, अशी झाडे किंवा अतिरिक्त झाडे लावण्यास त्याला फर्मावील; आणि जमिनीचा मालक किंवा भोगवटादार झाडे लावण्याच्या पुढील हंगामात अशी झाडे किंवा अतिरिक्त झाडे लावून त्या आदेशाचे अनुपालन करील :

[१] [ परंतु, पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट कृत्रिम रोपणाला लागू होणार नाही.]

(२) ज्या जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला, पोट-कलम (१) अन्वयें काढण्यात आलेल्या आदेशान्वये झाड किंवा झाडे लावण्याबाबत आदेश देण्यात आला असेल, ते झाड किंवा ती झाडे यांची योग्य वाढ होत असल्याबाबत व त्यांची चांगली देखभाल करण्यात येत असल्याबाबत खात्री करून घेणे हे त्या जमिनीच्या मालकाचे किंवा भोगवटादाराचे कर्तव्य असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाचे पालन करण्यात मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केल्यास त्या बाबतीत, वृक्ष अधिकाऱ्याला, अशा मालकाला किंवा भोगवटादाराला अभिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि या अधिनियमान्वये कसूरदार व्यक्तीविरुद्ध करण्यात येईल अशा इतर कोणत्याही कार्यवाहीस बाध येऊ न देता, त्याला स्वतःलाच आवश्यक ती कार्यवाही करता येईल आणि त्यासाठी करण्यात आलेल्या खर्चादाखल यथास्थिति, मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून देय असलेल्या रकमेची मागणी करणारी नोटीस त्याला दिल्यानंतर, अशा मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून अशा खर्चाची वसुली करता येईल. वृक्ष अधिकाऱ्याने नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत रक्कम भरण्यात आली नाही तर, तिच्यावरील दरसाल दरशेकडा सहा टक्के व्याजासह आणि इतर आनुषंगिक खर्च असल्यास त्यासह ती रक्कम वसूल करण्यात येईल.]

कलम ३ चे उल्लंघन करून झाडे तोडल्याबद्दल शास्ती.

४. कोणतेही झाड तोडण्यासाठी [२] [ परवानगी देण्यात आलेली नसताना किंवा देण्यात आली असल्याचे मानता येत नसताना ] कोणत्याही व्यक्तीने कोणतेही असे झाड तोडल्यास किंवा तोडावयास लावल्यास, ती व्यक्ती कलम ३ अन्वये अधिकार प्रदान केलेल्या [३] [वृक्ष अधिकाऱ्याने] चौकशी केल्यानंतर आणि अशा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर जी शिक्षा देणे त्यास योग्य वाटेल अशा जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि (शासनाची मालमत्ता नसणारे) अशा रीतीने तोडलेले कोणतेही झाड [४][व असे कोणतेही झाड तोडण्यासाठी आणि ते वाहून नेण्यासाठी वापरण्यात आलेली हत्यारे, नावा, वाहने किंवा वाहतुकीची इतर साधने] राज्य शासनाकडे सरकारजमा [४][होतील] असा आणखी आदेश [३][ वृक्ष अधिकाऱ्यास ] देता येईल.

कलम ३ चे उल्लंघन करण्यात आल्याचे विवक्षित अधिकाऱ्यांनी कळविणे.

५. (१) प्रत्येक महसूल अधिकाऱ्याने, वन अधिकाऱ्याने आणि पोलीस अधिकाऱ्याने.–

(क) कलमं ३ अन्वये अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास त्या कलमाच्या कोणत्याही उल्लंघनाची आणि असे उल्लंघन करण्याच्या इराद्यासंबंधी किंवा तयारीसंबंधी त्यास माहीत होईल अशी माहिती ताबडतोब देणे ;

(ख) जे उल्लंघन होण्याच्या बेतात आहे किंवा होण्याचा संभव आहे हे त्यास माहीत असेल किंवा तसे त्यास सकारण वाटत असेल, असे उल्लंघन होऊ नये म्हणून आपल्या अधिकाराच्या कक्षेतील योग्य ती सर्व उपायोजना करणे ;

हे त्यास बंधनकारक असेल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ३ अन्वये " परवानगी घेतल्याशिवाय " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ५ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ५ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला व " होईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) कलम ३ चे उल्लंघन करून एखाद्या ज़मिनीवरील एखादे झाड तोडले आहे किंवा तोडले जात आहे असे अव्वल कारकून किंवा नायब तहसिलदार याच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जा नसलेला कोणताही महसूल अधिकारी, वन क्षेत्रपालाच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जा नसलेला वन अधिकारी किंवा फौजदाराच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जा नसलेला पोलीस अधिकारी यास सकारण वाटत असेल त्या बाबतीत, त्यास कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल आणि असे तोडलेले झाड किंवा त्याचे कोणतेही तुकडे व त्याचे उत्पन्न आणि असे उल्लंघन करताना उपयोगात आणलेली हत्यारे, नावा, [1] [वाहने व वाहतुकीची इतर साधने] ताब्यात घेता येतील, अशा मालमत्तेवर ती मालमत्ता अशा रीतीने ताब्यात घेण्यात आल्याचे दर्शविणारी खूण करता येईल आणि तो अशा रीतीने त्या वस्तू ताब्यात घेतल्यासंबंधी कलम ३ अन्वये [2][अधिकार प्रदान केलेल्या वृक्ष अधिकाऱ्यास] कळवील.

(३) जेव्हा पोट-कलम (२) अन्वये कोणतीही मालमत्ता ताब्यात घेण्यात आली असेल तेव्हा, ती ताब्यात घेणारा अधिकारी, मालमत्ता स्वतःच्या अभिरक्षेत किंवा आपल्या हाताखालील कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेत ठेवील, आणि तो त्या मालमत्तेच्या योग्य अभिरक्षेबद्दल जबाबदार असेल :

परंतु, ताब्यात घेण्यात आलेली मालमत्ता ही त्वरित व स्वाभाविकरीत्या नाश पावणारी असेल किंवा ती अभिरक्षेत ठेवण्याचा खर्च तिच्या किंमतीपेक्षा अधिक होण्याचा संभव असेल त्या बाबतीत, ती ताब्यात घेणाऱ्या अधिकाऱ्यास ती मालमत्ता ताबडतोब विकता येईल :

परंतु आणखी असे की, अशी मालमत्ता सोईस्करपणे दुसरीकडे नेणे शक्य नसल्यास त्या बाबतीत अशी मालमत्ता ताब्यात घेणाऱ्या अधिकाऱ्यास, अशा मालमत्तेत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीच्या सांगण्यावरून, ती मालमत्ता, ज्या ठिकाणी ताब्यात घेण्यात आली असेल त्या ठिकाणी, तिच्यामध्ये हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीच्या किंवा जी अशी मालमत्ता ठेवून घेण्याचे पत्करील अशा कोणत्याही प्रतिष्ठित व्यक्तीच्या ताब्यात ठेवता येईल. मात्र तत्पूर्वी अशी व्यक्ती दोन किंवा अधिक जामीनदार देऊन ती अशा मालमत्तेची योग्य काळजी घेईल आणि मागणी करण्यात आली असता ती अशी मालमत्ता हजर करील अशा आशयाचे त्या मालमत्तेच्या किंमतीपेक्षा कमी नसेल एवढ्या रकमेचे बंधपत्र करून देईल.

(४) अशा रीतीने ताब्यात घेण्यात आलेली मालमत्ता, कलम ४ अन्वये राज्य शासनाकडे सरकारजमा करण्याविषयी आदेश देण्यात आला नसेल तर, अशी मालमत्ता ज्या व्यक्तीकडून ताब्यात घेतली असेल त्या व्यक्तीस परत करण्यात येईल.

(५) उपरोक्त रीतीने जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेच्या संबंधात त्रयस्थाने कोणत्याही प्रकारचा दावा सांगितला असेल तर, कलम ३ अन्वये अधिकार दिलेला [3][वृक्ष अधिकारी] त्या दाव्यासंबंधी चौकशी करील आणि त्या दाव्यासंबंधी अशा व्यक्तीची बाजू ऐकून घेतल्यानंतर त्यास असा दावा मंजूर करता येईल किंवा नामंजूर करता येईल.

या अधिनियमान्वये प्रकरणे निकालात काढण्याची कार्यपद्धती.

[4] [ ६. या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, जमीन महसूल अधिनियमाची प्रकरणे बारा व तेरा यांच्या तरतुदी या ज्याप्रमाणे जमीन महसूल अधिनियमान्वये निकालात काढलेल्या अनधिकृतरीत्या झाडे तोडण्याच्या प्रकरणाच्या बाबतीत लागू होतात, त्याचप्रमाणे त्या या अधिनियमान्वये निकालात काढलेल्या प्रकरणांना लागू होतील.]

---

[1] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६ (अ) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६ (अ) (दोन) अन्वये, " अधिकार दिलेल्या महसूल अधिकाऱ्यास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६ (ब) द्वारे " महसूल अधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

शास्ती केल्यामुळे किंवा जप्तीमुळे इतर शिक्षांस बाध येणार नाही.

७. या अधिनियमान्वये कोणतीही शास्ती केल्यामुळे किंवा कोणतीही मालमत्ता जप्त केल्यामुळे ज्या व्यक्तीला त्याची झळ पोहोचली असेल ती व्यक्ती इतर कोणत्याही कायद्यान्वये ज्या शिक्षेस पात्र ठरत असेल ती शिक्षा देण्यास प्रतिबंध होणार नाही.

चौकशी व कार्यवाही न्यायिक कार्यवाही असणे.

८. कोणत्याही [1][वृक्ष अधिकाऱ्यापुढील] चौकशीची सर्व कामे व कार्यवाही, भारतीय दंड संहिता, कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असल्याचे समजले जाईल. १८६० चा ४५.

अधिकारी हे लोकसेवक असणे.

९. या अधिनियमान्वये अधिकारांचा वापर करणारे किंवा कोणतीही कर्तव्ये किंवा कामे पार पाडणारे अधिकारी हे भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजले जाईल. १८६० चा ४५.

पैसे भरण्याविषयी दिलेल्या आदेशाची अमलबजावणी.

१०. या अधिनियमान्वये कोणत्याही [1] [वृक्ष अधिकाऱ्याने] किंवा राज्य शासनाने जी कोणतीही रक्कम भरण्याविषयी निदेश दिला असेल अशी रक्कम, ती भरण्याविषयी जिला आदेश दिला असेल त्या व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

कार्यवाही चालविण्यास मनाई.

११. या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असणाऱ्या कोणत्याही कृत्याबद्दल, राज्य शासनाविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये अधिकारांचा वापर करण्यास किंवा कर्तव्य पार पाडण्यास किंवा कामे पार पाडण्यास अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा कार्यवाही करता येणार नाही.

सूट.

१२. कोणत्याही स्थानिक क्षेत्राला या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींपासून सूट देणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास, राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे लादता येतील अशा (कोणत्याही असल्यास) शर्तीस अधीन राहून, तसे करता येईल.

व्यावृत्ती.

१३. व्यक्तीच्या किंवा मालमत्तेच्या कोणत्याही हानीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने किंवा एखाद्याच्या स्वतःच्या जमिनीवर होणारा कोणताही उपद्रव कमी करण्याच्या दृष्टीने कोणतेही झाड तोडण्याच्या संबंधात कलम ३ मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यांच्या तरतुदींच्या बरोबरीनेच या अधिनियमाच्या तरतुदीही असतील

१४. झाडे तोडण्यास मनाई करण्याच्या संबंधात किंवा झाडे तोडण्याचे विनियमन करण्याच्या संबंधात त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींबरोबरीनेच या अधिनियमाच्या तरतुदीही असतील.

---

[1] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याची अनुक्रमे कलमे ७ व ८ यांद्वारे, "महसूल अधिकाऱ्यापुढील" व "महसूल अधिकाऱ्याने" या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

१५. (१) राज्य शासनाला, पूर्व प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अमलात येईल किंवा, यथास्थिति, तो नियम अमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलांमुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

## अनुसूची

[ कलम २ (च) पहा]

१. हिरडा (Terminalia Chebula).

[1][२. साग (Teak).]

[2][३. महुआ, म्होवरा किंवा महु (Madhuca Latifolia).

४. टॅमरिंड, चिंच किंवा इमली. (Tamarindus Indica).]

[3][५. आंबा (Mangifera Indica).

६. फणस (Artocerpus Integrifolia).]

[4][७. खैर (Acacia Catechu).]

शासन अधिसूचना दि. ५/५/२०११ अन्वये काजू, कलमी आंबा, चिंच व फणस या प्रजाती अनुसूचीतून वगळलेल्या आहेत.

---

[1] नोंद क्रमांक २, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. टीआरएस, ११६५/१५२११५/बी, दिनांक १९ जानेवारी १९६८ अन्वये समाविष्ट करण्यात आली.

[2] नोंदी क्रमांक ३ व ४, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. टीआरएस, १०६९/१७६३१/बी, दिनांक २७ डिसेंबर १९६९ अन्वये समाविष्ट करण्यात आल्या.

[3] नोंदी क्रमांक ५ व ६, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. टीआरएस, १०८०/३६९५४/९२९-जी-७ दिनांक ९ जानेवारी १९८१ अन्वये समाविष्ट करण्यात आल्या.

[4] नोंद क्रमांक ७, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. टीआरएस, ११६९/१८७६२६/बी, दिनांक ७ डिसेंबर १९७० अन्वये समाविष्ट करण्यात आली.

[1][८. चंदन (Santalum.)]

[2][९. बिजा (Pterocarpus marsupium).

१०. हळदू (Adina cordofolia).

११. तिवास (Ougeinia dalbergioidies).]

[3][१२. ऐन (Terminalia tomentosa).

१३. किंजळ किंवा किंडळ (Terminalia Peniculata).]

[4][१४. अंजन (Hardwickia binata).

१५. जांभूळ (Syzigium cumini).]

[3][१६. खारफुटी (Mangrove).

**स्पष्टीकरण.**– या नोंदीच्या प्रयोजनार्थ, "खारफुटी" यात, रायझोफोरा मक्रोनाटा (कांदळ), रायझोफोरा ॲपिक्युलाटा (बिअम), सेरिओप्स कॅण्डोलेना (ॲरा), कॅण्डेलिआ न्हीडेइ (वाइट), ब्रुग्विक्रा जिम्नोरायझा (लॅम्क), लुम्निझेरा रिसेमोसा (वन्य), सोनेराशिआ ॲपेटेला (बुच हम), सोनेराशिआ ॲसिडा (दिन), ॲव्हिसेनिआ ऑफिसिनालिस (लिन), ॲव्हिसेनिआ मरिना (लिन), ॲकॅन्थस इलिसिफोलिअस, ॲजिसेरस माजूस व साल्वादोरा परसिका (लिन) यांचाही समावेश होतो. ]

---

[1] नोंद क्रमांक ८ ही शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. टीआरएस, ११६५/१५२११५/बी, दिनांक १५ मे १९७३ अन्वये जादा दाखल करण्यात आली.

[2] नोंदी क्रमांक ९, १०, ११, या शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग. क्र. टीआरएस, ११६५/१५२११५/बी, दिनांक ९ मार्च १९७४ अन्वये जादा दाखल करण्यात आल्या.

[3] नोंदी क्रमांक १२, १३ व १६, या शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग. क्र. टीआरएस, १०८५/८१२३९९/जी-७ दिनांक २८ जानेवारी १९८७ अन्वये जादा दाखल करण्यात आल्या.

[4] नोंदी क्रमांक १४ व १५ या शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग. क्र. टीआरएस, १०७५/४९६२/जी-६, दिनांक १६ जानेवारी १९७६ अन्वये जादा दाखल करण्यात आल्या.

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४.
  दूरध्वनी : २३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
  पुणे ४११ ००१.
  दूरध्वनी : २६१ २५ ८०८, २६१ २८ ९२०

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१.
  दूरध्वनी : २५२ २६ १५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१.
  दूरध्वनी : २३३ १४ ६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३.
  दूरध्वनी : २६५ ०३ ९५, २६५ ०४ ०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते

GOVERNMENT OF MAHARASHTRA

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

# Maharashtra Act No. XXXIV OF 1964

## The Maharashtra Felling of Trees (Regulation) Act, 1964

*( As modified up to 14th July, 2006 )*

PRINTED IN INDIA BY THE MANAGER, GOVERNMENT PRESS AND STATIONERY STORES, KOLHAPUR AND PUBLISHED BY THE DIRECTOR, GOVERNMENT PRINTING AND STATIONERY, MAHARASHTRA STATE, MUMBAI-400 004.

2006

[Price : Rs. 3-00]

# THE MAHARASHTRA FELLING OF TREES (REGULATION) ACT, 1964

## CONTENTS

PREAMBLE.

SECTIONS.

1. Short title and extent.
2. Definitions.
3. Restriction on felling of trees.

3A Powers of Tree Officer to order planting of trees.

4. Penalty for felling trees in contravention of section 3.
5. Contravention of section 3 to be reported by certain officers.
6. Procedure in cases to be dealt with under this Act.
7. Award of penalty or confiscation not to interfere with other punishments.
8. Inquiries and proceedings to be judicial proceedings.
9. Officers to be public servants.
10. Execution of order for payment of money.
11. Bar of proceedings.
12. Exemption.
13. Savings.
14. Provisions of this Act to be in addition to any other law for the time being in force.
15. Power to make rules.

SCHEDULE.

H34-1

## MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 1964.[1]

[THE MAHARASHTRA FELLING OF TREES (REGULATION) ACT, 1964]

*(Received the assent of the Governor on the 4th September 1964; assent first published in the Maharashtra Government Gazette, Part-IV, on the 7th September 1964.)*

Amended by Mah. 31 of 1967. (11-12-1967)*Amended by Mah. 17 of 1987. (21-7-1987)*
Amended by Mah. 19 of 1969. (14-04-1969)*Amended by Mah. 26 of 1989. (7-8-1989)*
Amended by Mah. 35 of 1999. (14-6-1999)*

**An Act to make better provision for regulating the felling of certain trees in the State of Maharashtra, for the purpose of the preservation thereof.**

WHEREAS it is expedient to make better provision for regulating the felling of certain trees in the State of Maharashtra, for the purpose of the preservation thereof, and for the protection of the soil against erosion and to provide for matters connected therewith; It is hereby enacted in the Fifteenth Year of the Republic of India as follows, namely :—

Short title and extent.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Felling of Trees (Regulation) Act, 1964.

(2) It extends to the whole of the State of Maharashtra but excluding an urban area.

Definitions.

**2.** In this Act, unless the context otherwise requires,—

[2][(*a-1*) "artificial plantation" means planting of minimum 100 seedlings of tree species per hectare through artificial means or by human agency on any land not being the property of Government;]

Mah. XLI of 1966.

[3][(*a*) "Code" means the Maharashtra Land Revenue Code, 1966;]

[3][(*b*) "Collector" includes a Revenue Officer appointed by the State Government to exercise the powers and perform the functions of the Collector under this Act;]

XVI of 1927.

[3][(*c*) "Forest-Officer" means a Forest Officer within the meaning of the Indian Forest Act, 1927;]

[4][ * * * *
* * * *]

(*d*) "Revenue Officer" means a Revenue Officer within the meaning of the [5][Code];

(*e*) "to fell a tree" including burning or cutting or lopping a tree, to cause substantial damage or destruction thereto ;

(*f*) "tree" means any tree specified in the Schedule; and the State Government may, by notification in the *Official Gazette*, and to or modify the Schedule, after considering the necessity for the protection of any variety of trees; and the provisions of sub-section (2) of section 15 in so far as they relate to laying before, and modification by the State Legislature shall apply in relation to such notification as they apply in relation to any rule made under that section ;

[6][(*ff*) "Tree Officer" means a 'Forest Officer' not below the rank of a Range Forest Officer ;]

---

1 For Statement of Objects and Reasons, *see Maharashtra Government Gazette*, 1964, Part V, p. 197.

2 Clause (*a-1*) was inserted by Mah 35 of 1999, s. 2.

3 Clauses (*a*) and (*b*) were re-lettered as clauses (*b*) and (*c*) and before clause (*b*) as so re-lettered clause (*a*) was inserted by Mah. 17 of 1987, s. 2(*a*).

4 Existing clause (*c*) was deleted, *ibid*, s. 2(*b*).

5 This word was substituted for the words "relevant Code" *ibid.*, s. 2 (*c*).

6 Clause (*ff*) was inserted by Mah. 26 of 1989, s. 2.

* This indicates the date of commencement of the Act.

(*g*) "urban area" means the area within the limits of a municipality, Municipal Corporation, Municipal Committee, Town Committee, or notified area committee or Cantonment constituted under any law for the time being in force; and includes a local area which is specified by the State Government in the *Official Gazette*, being an area which has a population of not less than five thousand and has not less than three-fourths of male workers engaged in non-agricultural pursuits ;

(*h*) words and expressions used but not defined in this Act shall have the meanings, respectively, assigned to them in the [1][Code.]

Restriction on felling of trees.

**3.** (*1*) Notwithstanding any custom, usage, or law for the time being in force, or the decree or order of a Court, or anything contained in any instrument to the contrary, no person shall fell any tree or cause such tree to be felled in any land, whether of his ownership or otherwise, except with the previous permission in writing of a [2][Tree Officer] duly empowered by the State Government in that behalf [3]* * * *

[4][(*1A*) If any person wishes to fell a tree, he shall apply in writing to the [5][Tree Officer] empowered under sub-section (*1*) for permission in that behalf.

(*1B*) The [5][Tree Officer] on receipt of an application—

(*a*) shall acknowledge the application within seven days;

(*b*) may, after due enquiry, either grant or refuse the permission, applied for in accordance with the provisions of rules made under section 15 ;

Provided that, no such permission shall be refused if the tree is dead, diseased or windfallen, or if it has silviculturally matured, [6][or if it constitutes obstruction to traffic, or if it is substantially damaged or destroyed by fire, lightning, rain, or other natural cause,] or if it constitutes an obstruction to efficient cultivation :

[7][Provided further that such permission shall be granted subject to the condition that the applicant shall plant equal number of trees of the same or any other species as the Tree Officer may direct on the same site or other suitable place in the vicinity in the ensuing planting season;]

[8][(*1Ba*) Notwithstanding anything contained in sub-section (*1B*), but subject to the rules made under section 15 in this behalf, the Tree Officer shall not refuse the application made under sub-section (*1A*) for carrying out silvicultural operations like thinning or felling of trees scientifically for optimum growth of an artificial plantation.]

(*1C*) If the [5][Tree Officer] fails to inform that applicant of his decision within [9][sixty days] from the date of acknowledgement of the application, or from the date of receipt of the application, if the application is not acknowledged, the permission applied for shall be deemed to have been granted.]

(2) Any person aggrieved by an order of the [5][Tree Officer] refusing to grant permission under [10][sub-section (*1B*)] may, within thirty days of the receipt of such order, appeal to the Collector, Subject to such rules of procedure as may be prescribed, the Collector may, after giving such person a reasonable opportunity of being heard, pass such order on the appeal as he thinks just and proper.

---

1 This word was substituted for the words "relevant Code" by Mah. 17 of 1987, s. 2(*d*).

2 These words were substituted for the words "Revenue Officer not below the rank of a Deputy Collector" by Mah. 26 of 1989, s. 3(*a*).

3 The portion beginning with the words "and in accordance with the Provisions of rules" and ending with the words "or if it constitutes an obstruction to efficient cultivation", was deleted by Mah. 31 of 1967, s. 2 (*a*).

4 Clauses (*IA*) to (*IC*) were inserted, *ibid*, s. 2 (*b*).

5 These words were substituted for words "Revenue Officer" by Mah. 26 of 1989, s. 3 (b), (c) (i), (d) (i) and (e) (i) respectively.

6 These words were inserted *ibid*, s. 3 (c) (*ii*).

7 The proviso was added, *ibid*, s. 3 (c) (*iii*).

8 This sub-section was inserted by Mah. 35 of 1999, s.3.

9 These words were substituted for the words "ninety days" by Mah. 26 of 1989, s. 3(*d*) (*ii*).

10 These words brackets, figures and letters were substituted for the words, brackets and figures "sub-section (*1*)", *ibid*, s. 3(*e*) (*ii*).

Power of Tree Officer to order planting of trees.

[1][3A. (*1*) If in the opinion of the Tree Officer the number of trees in any land (other than the land falling in any permanent drought-prone area identified by the State Government) is not adequate according to the standards prescribed by rules made under section 15, the Tree Officer may, by order, after giving a reasonable opportunity to the owner or occupier of the land of being heard, require him to plant such trees or additional trees, as the case may be, at such places in the land as may be specified in the order; and the owner or occupier of the land shall comply with the order by planting such trees or additional trees in the ensuing planting season.

[2][Provided that, nothing in sub-section (*1*) shall apply to an artificial plantation.]

(2) It shall be the duty of the owner or occupier of the land who is required by an order made under sub-section (*1*) to plant a tree or trees to ensure that they grow properly and are well preserved.

(*3*) Where the owner or occupier fails to comply with an order made under sub-section (*1*) the Tree Officer may, after giving a reasonable opportunity to such owner or occupier of making representation and without prejudice to any other action which may be taken against the defaulter under this Act take necessary action himself and recover the expenditure incurred therefor from the owner or occupier, as the case may be, after giving a notice of demand for the amount payable by him. If the amount is not paid within the time specified by the Tree Officer in the notice, it shall be recovered along with interest at six per cent. per annum and other incidental expenses, if any.]

Penalty for felling tress in contravention of section 3.

**4.** Any person who, [3][without permission being granted or deemed to have been granted] to fell any tree, fells any such tree or causes it to be felled, shall be liable to such penalty not exceeding one thousand rupees as the [4][Tree Officer] empowered under section 3 may, after holding an enquiry and giving such person an opportunity of being heard, deem fit to impose; and the [4][Tree Officer] may further order that any such tree felled (which is not the property of Government) shall be forfeited to the State Government [5][along with the tools, boats, vehicles or other conveyances used in felling and removing any such tree.]

Contravention of section 3 to be reported by certain officers.

**5.** (*1*) Every Revenue Officer, Forest Officer and Police Officer shall be bound—

(*a*) to give immediate information of any contravention of section 3 to the officer empowered under that section and of the intention or preparation to commit such contravention which may come to his knowledge ;

(*b*) to take all reasonable measures in his power to prevent such contravention which he may know or have reason to believe is about or likely to be committed.

(2) Any Revenue Officer, not below the rank of an Aval Karkun or Naib-Tahsildar, Forest Officer not below the rank of a Range Forest Officer and Police Officer not below the rank of a Sub-Inspector may enter upon any land, where he has reason to believe that any tree has been or is being felled, in contravention of section 3 and seize such felled tree or any loppings thereof, together with its produce and tools, boats, [6][vehicles and other conveyances] used in committing such contravention, place on such property a mark indicating that the same has been so seized and shall make a report of such seizure to the [7][Tree Officer empowered] under section 3.

(*3*) Where any property is seized under sub-section (*2*), the officer seizing it, shall keep the property in his own custody, or in the custody of any of his subordinates, and shall be responsible for the due custody thereof :

1 This section was inserted by Mah. 26 of 1989, s. 4.
2 This proviso was added by Mah. 35 of 1999, s. 4.
3 These words were substituted for the words "without obtaining permission" by Mah. 31 of 1967, s. 3.
4 These words were substituted for words "Revenue Officer" by Mah. 26 of 1989, s. 5 (*a*).
5 These words were added, *ibid*, s. 5 (*b*).
6 These words were substituted for the words "vehicle or cattle", *ibid*, s. 6 (*a*) (*i*).
7 These words were substituted for the words "Revenue Officer empowered", *ibid*, s. 6 (*a*) (*ii*).

Provided that, where the property seized is subject to speedy and natural decay or when the expense of keeping it in custody is likely to exceed its value, the officer seizing it may sell it at once :

Provided further that, where such property cannot conveniently be removed, the officer seizing it may, at the instance of the person interested in the property, leave it at the place where it has been seized in the charge of the person interested in the property or in the charge of any respectable person as will undertake to keep such property on his entering into a bond with one or more sureties in an amount not less than the value of the property, that he will take proper care of such property, and produce it when called for.

(*4*) If the property so seized is not ordered to be forfeited to the State Government under section 4, that property shall be returned to the person from whom it was seized.

(*5*) If any claim is set up by a third person to the property seized as aforesaid, the [1][Tree Officer] empowered under section 3 shall inquire into claim and may admit or reject it, after hearing such person in respect thereof.

Procedure in cases to be dealt with under this Act.

[2][**6.** Subject to the provisions of this Act and the rules made thereunder, the provisions of Chapters XII and XIII of the Code shall apply in relation to cases dealt with under this Act as those provisions apply in relation to cases of unauthorised felling of trees dealt with under the Code.]

Award of penalty or confiscation not to interfere with other punishments.

**7.** The award of any penalty or confiscation of any property under this Act shall not prevent the inflicting of any punishment to which the person affected thereby is liable under any other law.

Inquiries and proceedings to be judicial proceedings.

**8.** All inquiries and proceedings before any [1][Tree Officer] shall be deemed to be judicial proceedings within the meaning of sections 193, 219 and 228 of the Indian Penal Code. XLV of 1860.

Officers to be public servants.

**9.** The Officers exercising powers or discharging any duties or functions under this Act shall be deemed to be public servants within the meaning of section 21 of the Indian Penal Code. XLV of 1860.

Execution of order for payment of money.

**10.** Any sum the payment of which has been directed by any [1][Tree Officer] or State Government under this Act shall be recoverable from the person ordered to pay the same as an arrear of land revenue.

Bar of proceedings.

**11.** No suit or proceedings shall lie against the State Government or against any person empowered to exercise powers or to perform duties or discharge functions under this Act, for anything in good faith done or purporting to be done under this Act.

---

1 These words were substituted for the words "Revenue Officer" by Mah. 26 of 1989, s. 6(*b*), s. 7 and s. 8, respectively.

2 This section was substituted for the original by Mah. 17 of 1987, s. 4.

12. Subject to such conditions (if any) as may be imposed, the State Government may, if it is necessary so to do in the public interest, by notification in the *Official Gazette,* exempt any local area from all or any of the provisions of this Act. Exemption.

13. Nothing in section 3 shall apply to the felling of any tree for preventing damage to person or property or for abating any nuisance on one's own land. Savings.

14. The provisions of this Act shall be in addition to the provisions of any other law for the time being in force prohibiting or regulating the felling of trees. Provisions of this Act to be in addition to any other law for the time being in force.

15. (*1*) The State Government may, subject to the condition of previous publication, make rules to carry out the purposes of this Act. Power to make rules.

(*2*) Every rule made under this section shall be laid as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature while it is in session for a total period of thirty days which may be comprised in one session or in two successive sessions, and, if before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following both Houses agree in making any modification in the rule or both Houses agree that the rule should not be made and notify such decision in the *Official Gazatte,* the rule shall, from the date of such notification, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so however that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

## SCHEDULE

[*See* section 2 (*f*)]

1. *Terminalia Chebula* (Hirda).

[1][2. *Teak*]

[2][3. *Madhuca Latifolia* (Mahua, Mhowra or Mahu)

4. *Tamarindus Indica* (Temarind, Chinch or Imli).]

[3][5. *Mangifera Indica* (*Mango*)

6. *Artocerpus Integrifolia* (Jack)].

[4][7. *Acacia Catechu* (Khair)].

---

1 Entry 2 was added *vide* G. N., R. & F. D., No. TRS. 1165/152115, dated the 19th January 1968.

2 Entries 3 and 4 were added *vide* G. N., R. & F. D., No. TRS 1069/17631/B, dated the 27th December 1969.

3 Entries 5 and 6 were substituted *vide* G. N., R. & F. D., No. TRS 1080/36954/929-G-7, dated the 9th January 1981.

4 Entry 7 was added *vide* G. N., R. & F. D., No. TRS 1169/187626-B, dated the 7th December 1970.

[1][8. *Santalum* (Sandal).]

[2][9. *Pterocarpus marsupium* (Bija).

10. *Adina cordofolia* (Haldu).

11. *Ougelnia dalbergioidies* (Tiwas).]

[3][12. *Terminalia tomentosa* (Ain).]

[3][13. *Terminalia Peniculata* (Kinjal or Kindal).]

[4][14. *Hardwickia binata* (Anjan).

15. *Syzigium cumini* (Jambhul).]

[3][16. Mangrove.

*Explanation.*—For the purposes of this entry, "Mangrove" includes Rhizophora mucronata (Lamk), Rhizophora apiculata (Biam), Ceriops candolleana (Ara), Kandelia rheedei (Wight), Bruguicra gymnorhiza (Lamk), Lumnitzera recemosa (Willd), Sonneratia apetala (Buch Ham), Sonneratia acida (Dinn), Avicenia officinalis (Linn), Avicenia marina (Linn), Acanthus ilicifolius, Aegiceras majus and Salvadora persica (Linn).].

1 Entry 8 was added *vide* G. N., R. & F. D., No. TRS. 1165/152115-B, dated the 15th May 1973.

2 Entries 9, 10 and 11 were added *vide* G. N., R. & F. D., No. TRS. 1166/152115-B, dated the 9th March 1974.

3 Entries 12, 13 and 16 were added *vide* G. N., R. & F. D., No. TRS. 1085/812399/G-7, dated the 28th January 1987.

4 Entries 14 and 15 were added *vide* G. N., R. & F. D., No. TRS. 1075/4962-G-6, dated the 16th January 1976.

GPK—H 34-(6,108 Bks.)-9-2006

PRINTED AT THE GOVERNMENT PRESS, KOLHAPUR.

